
ISSN : 2349-638X
IMPACT FACTOR : 7.149

Aayushi International
Interdisciplinary Research Journal
E-mail : aiirjpramod@gmail.com Website : www.aiirjournal.com
Peer Reviewed & Indexed Journal

*Special Issue No. 84*

# Dr. Babasaheb Ambedkar an Architect of India

Vol. VI
Marathi



***Chief Editor***
**Mr. PRAMOD TANDALE**

***Editor***
**Ms. MEGHAVEE G. MESHRAM**
**Mr. NARESH W. PATIL**

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

| Sr. No. | Name of the Author | Title of the Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 289 | प्रा. कमलेश मानकर | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हिंदु कोड बिलातील सशक्त स्त्री | 1359 |
| 290 | प्रा. डॉ. वाल्मिक शंकर आढावे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | 1364 |
| 291 | प्रा. विणा शा. काकडे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार आणि आजची शैक्षणिक अवस्था | 1369 |
| 292 | डॉ. सविता अशोक व्हटकर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार व कार्य | 1372 |
| 293 | प्रा. डॉ. प्रशांत रा. देशमुख | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा सामाजीक दृष्टीकोन एक विश्लेषनात्मक अध्ययन | 1376 |
| 294 | महादेव चै. चुंचे | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन विषयक दृष्टिकोन | 1381 |
| 295 | डॉ. प्रियंका केवलदास अंबाडे (उके ) | स्त्री मुक्तीचे सुरक्षा कवच -हिंदू कोड बिल (विशेष संदर्भ -डॉ. बाबासाहेब आंबेडकर) | 1384 |
| 296 | प्रा. डॉ.सुनिल राजपूत | डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रणीत राजकीय पक्ष | 1389 |
| 297 | डॉ. विजया एच. राऊत | स्त्रीमुक्तीचा उद्गाता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 1394 |
| 298 | डॉ. कमलाकर पी. तागडे | डॉ. बी. आर. आंबेडकरांची शैक्षणिक दृष्टीकोण: एक समाजशास्त्रीय चिंतन | 1399 |
| 299 | प्रा.प्रभाकर वसंत पगार | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी विषयक विचार : वर्तमानातील उपयुक्तता | 1404 |
| 300 | प्रा. सतिश धवड | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ओबीसी करिता केलेले कार्य | 1409 |




Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638X www.aiirjournal.com

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रणीत राजकीय पक्ष

प्रा.डॉ.सुनिल राजपूत
सहयोगी प्राध्यापक
जवाहर महाविद्यालय,अणदूर,ता.तुळजापूर

**सारांश**

वंदनीय बोधीसत्व, पददलितांचे कैवारी, कायदेपंडीत, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन करत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारांचे राष्ट्रीय अधिष्ठान समजावून घेताना त्यांनी स्थापन केलेल्या राजकीय पक्षांच्या विचारप्रणालींचा अभ्यास करावा लागेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या अथवा त्यांच्या प्रेरणेने स्थापन करण्यात आलेले राजकीय पक्ष एका बाजूने दलितांस गोरगरीबांच्या हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या प्रयत्नावर जोर देतात. तर दुसऱ्या बाजूने आपल्या प्रांताचे व देशाचे हीत लक्षात घेऊन प्रांत आणि देश सामर्थ्यवान बनविण्यासाठी प्रांतापुढील आणि देशापुढील समस्या सोडविण्यासाठी नेमके काय केले पाहिजे हे त्या पक्षाच्या जाहीरनाम्यात व कार्यक्रमांच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रणीत राजकीय पक्षात स्वतंत्र मजूर पक्ष,'अखिल भारतीय शेडयूल्ड कास्ट फेडरेशन ' म्हणून ओळखला जाणारा पक्ष, आणि त्यांनी आपल्या हाताने ज्या पक्षाची घटना व रुपरेषा तयार करुन ठेवली होती पण त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या अनुयायांनी स्थापन केलेला 'भारतीय रिपब्लिकन पक्ष' इत्यादी पक्षांचा समावेश होतो.

या तीनही राजकीय पक्षांची स्थापना, ध्येयधोरणे व कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्याच प्रेरणेतून निर्धारीत झालेले असल्यामुळे त्या पक्षाचा जाहीरनामा ध्येयधोरणांसंबंधी आणि कार्यक्रमासंबंधी माहिती पाहणे म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय पक्षासंबंधीच्या विचारासंबंधी माहिती पाहणे होय. त्यादृष्टीने पहिल्या दोन राजकीय पक्षासंबंधीची त्यांच्या राजकीय विचारांच्या राष्ट्रवादी अधिष्ठानाच्या दृष्टिकोनातून माहिती विशद केली आहे.

**की वर्डस :-** स्वतंत्र मजूर पक्ष, राजकीय विचार, शेडयुल्ड कास्ट फेडरेशन

**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वाभिमानी,बुध्दीमान, प्रामाणिक,दीर्घपरिश्रमी असे बहुआयामी विचारवंत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची खरी तळमळ ही दुर्बल, दीनदुलित यांना विकसीत करण्याची होती. अठराविश्व दारिद्रयात अडकलेल्या समाजाचा विकास करणे हे त्यांचे मूळ उद्दिष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे राजकीय स्वरुपापुरते मर्यादीत नसून सामाजिक,आर्थिक,धार्मिक क्षेत्रात सुध्दा त्यांनी महत्वपूर्ण कार्य केलेले दिसून येते.

'कोणत्याही समाजात त्या देशातील सर्वसामान्य जनतेचा जीवनमार्ग हा राजकीय परिस्थितीने घडविलेला असतो. राजकीय सत्ता जनतेच्या आकांक्षांना मूर्त रुप देत हासते. ती ज्यांच्या हातात असते त्यांना आपल्या आशा-आकांक्षांना मूर्त रुप देण्याची संधी प्राप्त होते. सत्ता त्यांचीच बटीक बनत असते.' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले होते. या देशातील कॉंग्रेस पक्षाचे नेतृत्व, भांडवलदार,जमीनदार व ब्राम्हणवर्ग यांच्या हातात असल्याने राजकीय सत्ता त्यांच्याच हाती जाईल व येथील दलित कष्टकरी समाज गुलामासारखा राबविला जाईल. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. आणि असे होऊ नये यासाठी त्यांनी लोकशाही मूल्यांवर आधारीत असणारा'स्वतंत्र मजूर पक्ष' १९३६ साली स्थापन केला.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

**विषय निवड:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या राजकीय पक्षांची ध्येयधोरणे व कार्यक्रम इत्यादींची माहिती व्हावी. या दृष्टिकोनातून ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत राजकीय पक्ष' या विषयाची निवड केली आहे.

**विषय उद्देश:-**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारांचे राष्ट्रीय अधिष्ठान समजावून घेणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्यांसाठी वेगळा पक्ष का स्थापन करावा लागला? याचा अभ्यास करणे.

३) अस्पृश्यांच्या राजकीय मागण्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :-** प्रस्तुत विषयासाठी संदर्भ संशोधन साधनांचा उपयोग केला आहे.

**स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेला हा पहिला राजकीय पक्ष आहे. १५ ऑगस्ट १९३६ रोजीच्या टाईम्स ऑफ इंडियामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाहीर केले.य.दि.फडके यांनी डॉ.आंबेडकरांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या संदर्भात असे मत व्यक्त केले आहे की, १५ ऑगस्ट १९३६ रोजी टाईम्स ऑफ इंडियामध्ये डॉ.आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष हा नवा राजकीय पक्ष स्थापन केल्याचे जाहीर केले. आणि त्या पक्षाची उद्दिष्टये व कार्यक्रम यांचा तपशीलही जाहीर केला. जवळ जवळ सहा वर्षे हा पक्ष चालविल्यानंतर बाबासाहेबांनी तो गुंडाळला आणि त्याऐवजी १९ जुलै १९४२ रोजी नागपूरला 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' ची स्थापना केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या संदर्भातील वरील विचार संयुक्तीक वाटत नाहीत. कारण य.दि.फडके यांना असे वाटते की, बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करण्याचा निर्णय अचानकपणे घेतला नाही. असा एखादा राजकीय पक्ष स्थापन करण्याचा विचार प्रक्रिया बाबासाहेबांच्या मनात निश्चितपणे असावी, असा निष्कर्ष त्यांच्या ८ ऑगस्ट १९३० रोजीच्या नागपूरच्या अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेतील भाषणावरुन आपल्याला काढणे शक्य आहे. या परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध प्रकारच्या मागण्या केल्या होत्या. इ.स. १९३५ च्या कायद्याने भारतीयांना विधिमंडळावर प्रतिनिधीत्व मिळणार होते. त्यानुसार १९३७ साली निवडणूका होणार असल्याने या निवडणूकीत भाग घेण्यासाठी अस्पृश्यांच्या राजकीय पक्षाची आवश्यकता होती. कॉंग्रेस पक्ष अनेकदा अधिवेशनामधून समाजसुधारणा घडवून आणण्याविषयी अनेक ठराव करीत होता, परंतू त्याची अंमलबजावणी होत नव्हती. तसेच महात्मा गांधीच्या कॉंग्रेस पक्षाने त्यांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्यांच्या राजकीय मागण्यांना १९३२ साली विरोध केला होता. त्यामुळे अस्पृश्यांसाठी वेगळा पक्ष स्थापन करणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आवश्यक वाटत होते. कॉंग्रेसला प्रतिस्पर्धी एखादा प्रभावी पक्ष निर्माण व्हावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पक्षास 'स्वतंत्र मजूर पक्ष' असे नाव का दिले? याबाबत जनता या बाबासाहेबांच्या नियकतकालिकाच्या संपादकाने २२ ऑगस्ट १९३६ च्या रोजीच्या अंकात संपादकीय लेखात असे म्हटले आहे की, "प्रथमत: त्यांचा उद्देश फक्त अस्पृश्य वर्गासाठीच स्वतंत्र पक्ष स्थापन करावा असा होता व त्या पक्षापुरंताच व्यवहार्य असा मर्यादीत कार्यक्रम त्यांनी ठरविला होता. पण हा मूळ बेत बदलून या पक्षाला आता बहुसामान्य स्वरुपाचे नाव दिले आहे आणि या पक्षाला सर्वसामान्य स्वरुप देण्याचे कारण बाबासाहेबांनी असे सांगितले की, अस्पृश्येतर वर्गातील ब-याच लोकांनी



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

त्यांच्या कार्यक्रमाला पूर्ण अनुमती दिले असून त्याप्रमाणे त्यांच्या पक्षातर्फे निवडणूकीला उभे राहण्याचे कित्येकांनी ठरविले आहे. कारण ज्या मतदार संघास अस्पृश्य वर्गांना राखीव जागा नाहीत, अशा पुष्कळ मतदार संघात अस्पृश्य वर्गाचे मतदान भरपूर आहे आणि या आपल्या मताधिकाराचा उपयोग या नवीन पक्षातर्फे उभे राहणा-या कोणत्याही वर्गाच्या उमेदवाराला करुन घेता येईल."[३]

स्वतंत्र मजूर पक्षाबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना बाबासाहेबांनी असे म्हटले होते की,"अन्य राजकीय पक्षांशी शक्य तेवढे सहकार्य करण्याची नव्या पक्षाची तयारी असली तरी तो अन्य राजकीय पक्षाहून वेगळा व स्वतंत्र असेल, सर्वच अस्पृश्यांचा कष्टकरी मजूरांमध्ये समावेश होत असला तरी सर्व कष्टकरी मजूर अस्पृश्य समजले जात नव्हते. म्हणून केवळ अस्पृश्य श्रमजीवी लोकांचेच नव्हे तर सर्वच मजूरांचे हित साधण्यासाठी व त्यांचे कल्याण करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला"[४]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या स्वतंत्र मजूर पक्षाच्या व्यापक ध्येयधोरणाची व सर्व समावेशक कार्यक्रमाची अधिक महिती पक्षाच्या जाहीरनाम्यात मिळते.

**स्वतंत्र मजूर पक्ष जाहीरनामा :-**

१५ ऑगस्ट १९३६ रोजी जाहीर केलेल्या कार्यक्रमाचे सर्वसाधारण स्वरुप पुढीलप्रमाणे होते.

**१) नवीन सुधारणांविषयी धोरण :-** पूर्ण जबाबदारीच्या स्वराज्याचे स्वरुप निष्प्रभ करुन टाकण्याजोगे जे खास व अनियंत्रीत स्वरुपाचे अधिकार गव्हर्नरास मिळाले आहेत. त्यांचा उपयोग या बाबतीत होऊ नये, याबद्दल हा पक्ष जागृत राहील.

**२) आर्थिक धोरण:-** शेतीची प्रगती होऊन, तो धंदा जास्त फलमय व्हावा म्हणून लँड मॉर्गेज बँक, उत्पादक शेतकरी वर्गाच्या पतपेढया व खरेदी विक्री करणारी मंडळे (मार्केटिंग सोसायटी) यांची स्थापना करण्याचा या पक्षाचा कार्यक्रम आहे. तसेच सर्वसाधारणपणे जमिनदारांकडून होणारी शेतकरी कुळांची पिळवणुक अगर त्यांजकडून जमिनीचे भागलेपण काढून घेण्याची जमिनदारांची प्रवृत्ती विशेषतः खोती आणि तालुकावारी या पध्दतीत असणारी ही प्रवृत्ती शेतक-यांच्या हिताला विरोधी असल्यामुळे त्यापासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे अशा स्वरुपाचे कायदे करण्याचा प्रयत्न हा पक्ष करील.

**३) करधारा पध्दतीविषयी या पक्षाचे धोरण :-** प्रजेचे कल्याण व वाढता उत्कर्ष होण्यास सरकारने राष्ट्रसंवर्धक असे कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. करधारा पध्दतीमुळे असणारी विषमता दूर करण्याचा प्रयत्न हा पक्ष करील.

**४) सामाजिक सुधारणा: -** सर्वप्रकारच्या आवश्यक अशा सामाजिक सुधारणा म्हणजे सनातन्याकडून समाजसुधारकावर पडणा-या बहिष्कारास आळा घालणे, धार्मिक द्रव्यनिधीचा दुर्विनियोग होऊ नये यासाठी सार्वजनिक धर्मादाय संस्थांवर सरकारी नियंत्रण ठेवणारे कायदे करणे, अनाथ निराश्रीत लोकांच्या कल्याणासाठी कायद्याने योजना करणे.

**५) ग्राम संघटना :-** ग्रामसंघटनेच्या दृष्टीने आवश्यक अशी सुखाची राहणी ग्रामीण जीवनात प्राप्त व्हावी यासाठी शक्य त्या उपाययोजना करणे, आरोग्य सुधारणे, खेडयात वाचनालये सार्वजनिक हॉल यांची योजना करुन जनमानसांची विचार पंरपरा प्रगतीशील करणे.

**६) शिक्षण :-** मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणाची योजना अंमलात आणणे, औद्योगिक शिक्षणावर भर देणे, विश्वविद्यलयीन शिक्षणाची पुनर्घटना करण्याचे कायदे हा पक्ष पुढे आणील.

**७) राज्य कारभार :-** राज्यकारभाराची पध्दती सूक्ष्म, इष्ट परिणामकारक व दोषरहीत चालावी असे या पक्षाचे प्रयत्न चालू राहतील. सरकारी नोकरीत एके ठिकाणी एकाच जातीचा अगर वर्गाचा भरणा होऊ नये असे या पक्षाचे धोरण आहे.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्याच्या तरतूदीत कल्याणकारी राज्याची कल्पना अभिप्रेत असण्याचे लक्षात येते. यातून व्यापक व वास्तव स्वरुपाचा कायदेशीर व सामाजिक दृष्टीकोनच स्पष्ट होतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यावर भाष्य करताना धनंजय कीर म्हणतात,"हा जाहीरनामा गरीबांच्या उत्कर्षाच्या ध्येयाने प्रेरीत झालेला होता. इतका ध्येयपूर्ण, निःसंदिग्ध व जनहिताबद्दल दक्षता दर्शविणारा जाहीरनामा तत्कालीन राजकीय पक्षात सापडेल."[६]

स्वतंत्र मजूर पक्षाने १९३७ ते १९३९ या दरम्यान महत्वाची कामगिरी केली. या पक्षाच्या प्रतिनिधींनी विधिमंडळात अनेक विधेयक मांडली. अनेक विधेयकांवर प्रभावीपणे मते मांडली. सर्वांनी विधिमंडळ कामकाजात भाग घेतला. त्यामुळे सरकार पक्षाला खरी भिती स्वतंत्र मजूर पक्षाच्या प्रतिनिधींची वाटत होती.

**शेडयुल्ड कास्ट फेडरेशनची स्थापनाः-**

१५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केल्याचे जाहीर केले होते. पण हा पक्ष शेवटी बरखास्त करुन १९ जूलै १९४२ रोजी नागपूर येथे बाबासाहेबांच्या पुढाकाराने शेडयुल्ड कास्ट्स फेडरेशनची स्थापना करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. हा नवा पक्ष स्थापन करण्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३० व ३१ मार्चला दिल्ली येथे भारतातील प्रमुख अस्पृश्य नेत्यांची बैठक आयोजित केली होती.

जुलै १९४२ मध्ये नागपूर येथे मद्रासचे राव बहाद्दूर एन शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन भरविले. यावेळी जनसमुदायाला उद्देशून त्यांनी आपण आता हिंदू समाजाचे घटक नाही तर भारतीय समाजाचे एक स्वतंत्र घटक आहोत. म्हणून आपणास स्वतंत्र राजकीय हक्क पाहिजेत. आपली सर्वांगीण उन्नती झाली पाहिजे, पण आपल्याजवळ आर्थिक बळ व सामजिक सामर्थ्य नाही, त्याकरिता आपल्याला राजकीय सत्ता पाहिजे. ही राजकीय सत्ता आपण-आपल्या संघटनेच्या बळावर हस्तगत केली तरच आपली प्रगती होईल. हा आपल्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. त्यावर आपण आपले सारे लक्ष केंद्रीत केले पाहिजे. यासाठी आपल्याला अखिल भारतीय स्वरुपाच्या संघटनेची गरज आहे. त्याकरिता 'शेडयुलड कास्ट्स फेडरेशन नावाच्या पक्षाच्या स्थापना करीत आहोत.[७]

१७-२० जुलै १९४२ रोजी ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची नागपूरच्या अधिवेशनात स्थापना झाली. मद्रासचे दलित नेता राव बहाद्दूर एन. शिवराज हे याचे पहिले अध्यक्ष आणि मुंबईचे पां.न. राजभोज हे पहिले महासचिव झाले. वास्तविक शेडयुल्ड कास्ट फेडरेशन हे १९३६ साली स्थापन झालेल्या स्वतंत्र मजूर पक्षाचे विकसीत रुप होते.

**शेडयुल्ड कास्ट्स फेडरेशनचा जाहीरनामाः -**

मद्रास येथे २३/०९/१९४४ रोजी शेडयुल्ड-कास्ट्स-फेडरेशनच्या कार्यकारीणी मंडळाची बैठक एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी खालील ठराव पारित करण्यात आले.

१) अस्पृश्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करावे.

२) भारतीय घटनेला अस्पृश्य वर्गाची संमती पाहिजे. त्याशिवाय ती घटना मान्य होणार नाही.

३) जातीय प्रश्न मिटवित असताना सर्व जातीय प्रतिनिधींच्या समोर या प्रश्नांची चर्चा व्हावी.

४) सर्व अल्पसंख्यांकांनो समान वागणूक द्यावी.

५) संयुक्त मतदारसंघ रद्द करुन त्या ठिकाणी स्वतंत्र मतदारसंघाची योजना मान्य करावी.

६) अस्पृश्यांसाठी स्वतंत्र वसाहती स्थापन कराव्यात.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

वरील मागण्यांसाठी फेडरेशनच्या सर्व पक्षशाखांना सत्याग्रह करण्याचे आदेश देण्यात आले. अनेक ठिकाणी पक्ष कार्यकर्त्यांनी सत्याग्रह घडवून आणले. त्यामुळे अस्पृश्यांमध्ये लढाऊ प्रवृत्ती बळावली, त्यांचा आत्मविश्वास वाढला.

पुढे २५ मार्च १९४६ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये शे.का.फे ने आपले उमेदवार उभे केले. उमेदवारांचा प्रचार डॉ. आंबेडकर व इतरांनी केला. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी असंख्य अस्पृश्य मतदारांनी शे.का.फेडरेशनच्या उमेदवारां

थोडक्यात स्वतंत्र मजूर पक्ष हा अस्पृश्यांचा पहिला राजकीय पक्ष होता. यात सर्व अस्पृश्य , शेतकरी,शेतमजूर व कामगार सामील होणे गरजेचे होते. परंतू तसे झाले नाही. पूर्वाश्रीमीच्या महार समाजाने या पक्षाला सहकार्य केले. त्याप्रमाणे अस्पृश्यांमधील चांभार व मातंग या समाजाने फारसे सहकार्य केले नाही आणि विविध जाती धर्मातील शेतकरी, शेतमजूर व कामगार वर्ग जातीच्या व धर्माच्या नावाखाली विभागला गेल्यामुळे या सर्वांचे फारसे सहकार्य लाभले नाही. त्यामुळे हा पक्ष शक्तिशाली होऊ शकला नाही. तसेच दुस-या जागतिक महायुध्दामुळे भारतातील इतर सर्व पक्षांबरोबर स्वतंत्र मजूर पक्ष बरखास्त करुन स्थापन केलेला शेडयुल्ड फास्ट्स फेडरेशन हा पक्षही सार्वत्रिक निवडणूकीत अपेक्षीत यश संपादन करु शकला नाही. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "शेड्युल्ड कास्ट फेडरेशन" बरखास्त करुन "भारतीय रिपब्लिकन पक्ष" स्थापन करण्याची घोषणा १९५६ मध्ये केली होती. परंतू पक्ष स्थापन करण्यापूर्वीच ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे महापरिनिर्वाण झाले. त्यानंतर त्यांच्या अनुयायी व कार्यकर्त्यांनी पक्ष स्थापन करण्याची योजना आखली.

**संदर्भसूची :-**

१) यशवंत दिनकर फडके, आंबेडकरी चळवळ, द्वितीय आवृत्ती, श्री विद्या प्रकाशन, पुणे पृ.क्र. ८३.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा- संपादक शंकरराव खरात, इंद्रायणी साहित्य, शनिवार पेठ, पुणे प्रकाशन वर्ष १९८७ पृ.क्र.१०२
३) जनता २२ ऑगस्ट १९३६
४) इंडिपेंडंट लेबर पार्टी : इटरा एम्स १९३७ पृ.क्र.३
५) डॉ.रावसाहेब कसबे :- डॉ.आंबेडकर वाद-तत्वे आणि व्यवहार, पृ.क्र.६५–६७ परिशिष्ट-१ , प्रथम आवृत्ती १९८९. सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे-३०
६) धनंजय कीर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तिसरी आवृत्ती १९८१, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पृ.क्र.२९५–२९६
७) खैरमोड चांगदेव, डॉ.भीमराव रामजी आंबेडकर, खंड ८ कालखंड १९३८ ते १९४५ सुगावा प्रकाशन, पुणे. पृ.क्र.१२६



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad